पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय निगडी, पुणे-४४
जा.क्र.:-अक्षेका/९/कावि/ १८० /२०१८
दिनांक :- ०४/१०/२०१८

प्रति,
मा.श्री./श्रीम. -------------------------------
सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- 44

विषय:- अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची मासिक सभा
दिनांक ०९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. आयोजित केलेबाबत..

मा. महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अ प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१८ ची मासिक सभा मंगळवार दिनांक ०९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. प्रस्तुत सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी-44

प्रत :- सर्व संबंधित अधिकारी

-----------------------------------

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
## अ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक ०७

**दिनांक :- ०९/१०/२०१८** **वेळ: सकाळी ११.३०वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची मासिक सभा मंगळवार दिनांक०९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

कार्यपत्रिका क्रमांक ६ दिनांक ११/०९/२०१८ रोजीचा अ प्रभाग समितीचा सभावृत्तांत कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | महात्मा फुले जनसेवा संघ यांचे पत्र क्र.२१/८/२०१८ रोजीचे पत्रावर मा.महापौर कार्यालयाकडील पत्र क्र.महा/कावि/१००३/२०१८ दि.२७/८/२०१८अन्वये पुढील आवश्यक कार्यवाही करणेकामी कळविण्यात आलेनुसार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकातील सभागृहास कै.विजय सदाशिव जाधव यांचे नाव देणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक २ | नगरसचिव कार्यालयाकडील पत्र क्रमांक नस/०४/कावि/६२२/२०१८ दि.२१/०९/२०१८ अन्वये कळविलेनुसार प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य् यांना आयडेंटीटी कार्ड, व्हिजीटींग कार्ड,शिफारस पत्र,लेटरपॅड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक ३ | सन्मा.सदस्य जावेद शेख यांचे दि.२६ सप्टेंबर २०१८ चे पत्रानुसार आकुर्डी पांढारकर नगर येथे बिना इंग्लिश मिडीयम शाळेसमोरील सार्वजनिक मुतारी काढून टाकण्यात येऊन् त्या परिसराच्या स्वच्छतेसाठी तेथे वाचनालय पानपोई बसविणेस मान्यता देणे. तसेच शाळेसमोरील दोन्ही मार्गावर शाळा असलेबाबत दिशादर्शक बोर्ड लावण्यास मान्यता देणे. |
| विषय क्रमांक ४ | सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचे दि.३/१०/२०१८ चे पत्रानुसार प्र.क्र.१० मधील स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळा,काळभोरनगर या शाळेस रंगरंगोटी तसेच कंपाऊंडवरील तारेचे कुंपण करणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक ५ | सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचे दि.३/१०/२०१८ चे पत्रानुसार प्र.क्र.10 मधील खालील नमूद केलेल्या ठिकाणी चौकांचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे.<br>१. ऍटो क्लस्टर जवळील लिंगायत स्मशानभूमिकडे जाणा-या रोडवरील चौकाचे सुशोभिकरण करणे.<br>२. बर्ड व्हॅली समोरील चौकाचे सुशोभिकरण करणे.<br>३. मोरवाडी कोर्टासमोरील लालटोपीनगरकडे जाणा-या रस्त्यावरील चौकाचे सुशोभिकरण करणे<br>४. आंबेडकर चौक,संभाजीनगर, चिंचवड या चौकाचे सुशोभिकरण करणे. |

मा. सभापती यांचे संमत्तीने/परवानगीने ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी-४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी- ४४.

क्रमांक:- अक्षेका/९/कावि /१८०/२०१८ दिनांक:- ०४/१०/२०१८.